N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** तलोडा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0369 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 04/08/2026 19:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिंनाक पासून):** 04/08/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 04/08/2026
   **Time From (वेळेपासून):** 11:45 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 11:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 04/08/2026 **Time (वेळ):** 18:22 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 027

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 04/08/2026 18:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय,तळोदा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): संदीप केजराज पाटील

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नंदु,नंदुरबार,तलोडा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नंदु,नंदुरबार,तलोडा,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7774899725

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविंद्र निंबा कानडे | | | 1. सहाय्यक महसुल अधिकारी, तहसील क,तळोदा,तलोडा, नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | मागणी केलेली लाचेची रक्कम 5000/ रुपये | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

तळोदा पोलीस स्टेषन
दिंनाक- 04/08/2026

मी, संदीप केजराज पाटील, वय 41 वर्षे, पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, नंदुरबार. मो.नं. 7774899725.

सरकारतर्फे फिंयादी होवुन फिंयाद लिहुन देतो की, मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, नंदुरबार येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दिंनाक 03/08/2026 रोजी तक्रारदार राजेंद्र मानसिंग पाडवी, वय 41 वर्षे, व्यवसाय- नोकरी, माध्यमिक शिक्षक, हुतात्मा किसन अहिर विद्यालय, वाळवा सध्या ता.वाळवा जि.सांगली मुळ रा. मुक्काम लक्कडकोट, पोश्ट- अमोणी ता.तळोदा जि.नंदुरबार, यांनी चापोहवा/जितेंद्र महाले नेमणुक ला.प्र.वि. नंदुरबार यांना फोनवर संपर्क करुन एका लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्याबाबत कळवुन तळोदा येथे येवुन कारवाई करण्याबाबत विंनती केली. त्याप्रमाणे आम्ही प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी प्रकल्प कार्यालय नंदुरबार यांना पत्र पाठवुन त्यांचे कार्यायातील पंच 1) श्री. सिध्देष राजु जगताप, कनिश्ठ लिपीक व 2) श्री. योगेष रमेष भावड, कनिश्ठ लिपीक, यांना पंच म्हणुन अॅन्टी करप्षन कार्यालय, नंदुरबार येथेे उपलब्ध करुन घेतले.

त्यानंतर आम्ही दिंनाक 03/08/2026 रोजी पोहवा/विजय ठाकरे, पोना/हेमंतकुमार महाले, दोन्ही पंच असे सकाळी 11.00 वाजता अॅन्टी करप्षन ब्युरो नंदुरबार कार्यालयातुन खाजगी वाहन किया सेलटाॅस क्रमांक जी.जे.26 अे के 1968 हिचेने सापळा कारवाईकामी लागणारे सर्व साहित्य (अल्ट्राव्हॅायोलेट लॅम्प/टाॅ
च
, अ.पा. बाटली, काळे कापड, कोरे कागद, सिल, लाख, धागा, खाकी पाकिट, हिरवे पाकिट, व्हाॅईस रेकाॅर्डर, नविन मेम

‘‘ मी वरील ठिकाणी सन 2010 पासुन माध्यमिक षिक्षक म्हणुन हुतात्मा किसन अहिर विद्यालय, वाळवा ता.वाळवा जि.सांगली या ठिकाणी नोकरीस आहे. पत्नी सगुणा मुलगा रिकेष मुलगी रोहीणी अषांसह राहतो. माझे गाव लक्कडकोट ता.तळोदा येथे आहे. आमची वडीलोपार्जित षेती लक्कडकोट ता.तळोदा येथे आहे. सध्या षेतीचे कामकाज माझे वडील मानसिंग पाडवी हे पाहतात. मी मागील वर्शी मे महिण्यात गावी आलो होतो तेव्हा माझे नातेवाईक फतेसिंग गोरजी पाडवी यांची तळोदा तालुक्यातील रोझवा षिवारातील गट क्रमांक उपविभाग 120/1 यांनेल एक एकर षेती विकणार असल्याचे माहित झाल्याने मी त्यांच्या कडुन नमुद षेती आठ लाख रुपयात विकत घण्याबाबत सौदा केला होता.

नमुद षेती ही माझी पत्नी सगुणा हिच्या नावावर करण्यासाठी मी फतेसिंग गोरजी पाडवी यांना सांगितले. त्यांनी संबधीत कागदपत्रे मला दिली. परंतु सदरची षेती ही जुनी षर्तची असल्याने सदर षेती नावावर करण्यासाठी कुळ कायदयाचे कलम 32 (एम) प्रमाणपत्राची आवष्यकता असते, त्यासाठी षेत नावावर आहे त्यांच्या नावाने संबधीत तहसील कार्यालयात अर्ज करावा लागतो. त्यामुळे माझे विंनतीवरुन फतेसिंग गोरजी पाडवी यांनी मा. तहसीलदार, तहसील कार्यालय, तळोदा येथे कुळ कायदयाचे कलम 32 (एम) प्रमाण पत्र मिळण्यासाठी दि. 20/02/2026 रोजी अर्ज केला होता.

सदर अर्जाचे कामकाज तहसील कार्यालय, तळोदा येथील महसुल षाखेचे क्लर्क रविंद्र कानडे यांच्याकडे होते. त्यानंतर मी सांगली येथे गेल्यानंतर मी माझे नातेवाईक फतेसिंग गोरजी पाडवी यांनी सांगितल्याप्रमाणे तहसील कार्यालय, तळोदा येथील क्लर्क कानडे यांच्याकडे कुळ कायादयाचे कलम 32 (एम) प्रमाण पत्र मिळणे कामी नेहमी यांच्या मोबाईल क्रमांक 9421949698 यावर बरेच वेळा फोन करुन विचारले असता ते मला नेहमी वेगवेगळे

उत्तरे देवुन टाळत होते.

मी दोन ते तीन दिवसापुर्वी सुटी घेवुन गावी आलो होतो तेव्हा मी तहसील कार्यालय, तळोदा येथे जावुन तेथील क्लर्क रविंद्र कानडे यांच्याकडे 32 (एम) प्रमाण पत्राबाबत विचारणा केली असता त्यांनी मला 5,000/- रुपये तुम्हाला दयावे लागतील, नाहीतर ती फाईल पुढे पाठविणार नाही असे सांगितले होते. क्लर्क कानडे मागत असलेले 5,000/-रुपये ही कोणतीही फी नसुन ती लाचच आहे याबाबत माझी खात्री झाली असुन, क्लर्क कानडे यांचे सोबत माझा कोणत्याही प्रकारचा वाद भानगड नसुन देवाण-घेवाणीचा, उसनवारीचा व्यवहार नाही. त्यांचे व माझे कोणत्याही प्रकारचे वादविवाद नाही.

मला क्लर्क, कानडे यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने, मी दिंाक 03/08/2026 रोजी अॅन्टी करप्षन ब्युरो, नंदुरबार येथील माझे ओळखीचे पोलीस श्री.जितेंद्र महाले सर यांना फोनवर संपर्क करून हकीकत संागितली व तळोदा येथे येवुन कारवाई करण्याबाबत विंनती केली होती. त्याप्रमाणे आपण आज दिंनाक 03/08/2026 रोजी आपल्या अषा मजकुरची तक्रार तक्रारदार श्री. राजेंद्र मानसिंग पाडवी यांनी स्वःहस्ताक्षर लिहून दिलेली असून तक्रारीवर तक्रारदार, दोन्ही पंच, व आम्ही वाचून सहया केलेल्या आहेत.

त्यानंतर आम्ही लाचेचा सापळा कार्यवाहीमध्ये सुरूवातीला पडताळणी करणे आवश्यक असल्याने आम्ही दिलेल्या सुचनेवरुन पोहवा/विजय ठाकरे यांनी सोनी कंपनीचा एक डिजीटल व्हाॅईस रेकाॅ
ड
र व 16 जी.बी.चे सॅनडिस्क कंपनीचे एक नवीन सीलबंद मेमरी कार्ड डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये टाकून त्यात फोल्डर त्यानंतर तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा दोन्ही पंचांसमक्ष सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी, दिंनाक 03/08/2026 रोजी आरोपी लोकसेवक श्री. रविंद्र निंबा कानडे, वय 51 वर्शे, व्यवसाय नोकरी सहाय्यक महसुल अधिकारी, तहसील कार्यालय तळोदा, जिल्हा नंदुरबार यांनी त्यांचे सार्वजनिक कर्तव्य अनुचितपणे, अप्रामाणिकपणे करून स्वतःच्या पदाचा व अधिकाराचा दुरूपयोग करून स्वतःचा सांपत्तीक फायदा करुन घेण्याचे हेतुने भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वतःसाठी अन्य पारितोषण मिळावे म्हणून मुळ तक्रारदार श्री. राजेंद्र पाडवी हे खरेदी करणार असलेल्या षेताचे मालक श्री. फतेसिंग गोरजी पाडवी यांचे जुने षर्तीचे षेत असल्याने सदर षेतखरेदी कामी लागत असलेले कुळ कायादयाचे कलम 32 (एम) प्रमाणपत्र देण्याच्या मोबदल्यात 5000/-रुपये लाचेची मागणी केली व मागणी केलेली लाचेची रक्कम दि.04/08/2026 रोजी 11/45 वाजेच्या सुमारास पंच क्र. 1 यांचेसमक्ष तळोदा तहसील कार्यालयाचे बाहेरील हाॅटेल गुरुकृपा टी स्टाॅल येथे तक्रारदार राजेंद्र पाडवी यांचे कडून स्विकारली, म्हणुन माझी वरील आरोपी लोकसेवक श्री. रविंद्र निंबा कानडे यंाचेविरूध्द सरकारतर्फे भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम, 1988 चे कलम 7, प्रमाणे फिंयाद आहे.

समक्ष हि फिंयाद दिली सही

दिंनाक- 04/08/2026.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Rajendra Ganesh More(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

व 16 जी.बी.चे सॅनडिस्क कंपनीचे एक नवीन सीलबंद मेमरी कार्ड डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकून त्यात फोल्डर नं 1 ची निवड केली व तक्रारदार दोन्ही पंचांना पडताळणी कारवाईबाबतच्या योग्य त्या सूचना दिल्या. तक्रारदार राजेंद्र पाडवी यांचे षर्टचे आतील त्यांचे बनियनला लेसच्या सहाय्याने अडकवले. त्यानंतर तक्रारदार श्री. राजेंद्र पाडवी यांच्या सोबत पंच नं. 1 श्री. सिध्देष राजु जगताप अषा दोघांना तहसिल कायर्सालय तळोदा ,येथे लोकसेवक रविंद्र कानडे यांची भेट घेणेकामी खाजगी स्कुटी वाहनाने रवाना केले. व आम्ही सापळा पथक असे वर नमुद ठिकाणी थांबुन राहीलो. काही वेळाने तक्रारदार श्री. राजेंद्र पाडवी व पंच नं. 1 श्री.सिध्देष राजु जगताप असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. नंतर पोहवा/विजय ठाकरे यांनी तक्रारदार यांचे षर्टच्या आतील बनियनला अडकवलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन ते बंद करुन ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही पंच नं. 1 यांना तक्रारदार व लोकसेवक कल्र्क रविंद्र कानडे यांचे भेटीदरम्यान काय बोलणे झाले याबाबत विचारपुस केली असता पंच नं 1 श्री. जगताप यांनी हकिकत सांगितली की, तहसिल कार्यालय तळोदा येथे आम्ही गेलो असता, तेथे लोकसेवक रविंद्र कानडे हे भेटले. भेटल्यानंतर त्यानंतर काही वेळाने तक्रारदार राजेंद्र पाडवी यांना घेवुन क्लार्क कानडे हे कार्यालयाचे बाहेर आले बाहेर येवुन डाव्या बाजुला भिंतीच्या जवळ येवुन त्यांचेत चर्चा सुरु झाली, चर्चे दरम्यान मला सदर इसम हे लोकसेवक क्लार्क कानडे असल्याचे समजले. त्यानंतर लोकसेवक रविंद्र कानडे यांनी तक्रारदार यांना " तुम्हाला ते योग्य वाटत ते दया जास्तीस जास्त पाच हजार रुपये मला करुन दया, करुन देवु लगेच ते बोलले मला काल स्वताहुन बोलले करुन दया म्हणे," असे म्हणुन लाचेची मागणी केल्याचे सांगितले. तसेच तक्रारदार यांनी सुध्दा मिळती जुळती हकिकत सांगितली .त्यानंतर तक्रारदार राजेंद्र पाडवी व लोकसेवक कानडे यांचेतील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाशण हे दोन्ही पंचांसमक्ष खाजगी वाहनातच ऐकले लोकसेवक यांनी 5,000/-रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पश्ट झाले. त्यानंतर तक्रारदार श्री.राजेंद्र पाडवी यांनी सांगितले की, लोकसेवक कानडे यांनी सांगितले आहे की, तुमची फाईल उदया साहेबांच्या टेबलावर ठेवतो म्हणुन तुम्ही उदया या, असे सांगितल्याने पुढील सापळा कार्यवाही दिनांक 04/08/2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसा सोबतच्या पंचांसमक्ष सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे त्यानंतर आज दि. 04/08/2026 रोजी आम्ही, सोबतचे सापळा पथकातील अधिकारी, अंमलदार व दोन्ही षासकीय पंच असे सापळा कारवाईकामी सर्व साहित्यानिषी दोन खाजगी वाहनाने स्टाफसह तळोदा येथील ग्रामिण रुग्णालयाच्या परिसरात पोहोचलो. सदर ठिकाणी तक्रारदार श्री. राजेंद्र पाडवी हजर होते. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे वेतनाच्या उत्पन्नाचे बचतीतुन 5,000/-रुपये, त्यात 500/- रु. दराच्या 10 चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांना पोहवा/ देवराम गावीत यांनी पंचांसमक्ष अॅन्थ्रासीन पावडर लावली व सदर नोटा आम्ही तक्रारदार यांचे षर्टच्या डावे खिषात ठेवल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोहवा/ विजय ठाकरे यांनी सोनी कंपनीचा एक डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व 16 जी.बी.चे सॅनडिस्क कंपनीचे एक नवीन सीलबंद मेमरी कार्ड डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकून त्यात फोल्डर नं 1 ची निवड केली. व तक्रारदार यांचे षर्टच्या आतिल बनियनला लेसच्या सहाय्याने अडकवले. त्यानंतर तक्रारदार, व पंच नं 1 सिध्देष जगताप अषांना लोकसेवक कल्र्क रविंद्र कानडे यांची भेट घेणेकामी तहसील कार्यालय, तळोदा येथे दुपारी 11/01 वाजेच्या सुमारास पाठविले व त्यांचे पाठोपाठ आम्ही व सापळा पथक असे तहसील कार्यालय तळोदा येथील इमारतीचे आजुबाजुस व परीसरात थांबुन राहिलो. थोडयावेळाने तक्रारदार राजेंद्र पाडवी व लोकसेवक कल्र्क रविंद्र कानडे असे तहसील कार्यलयाच्या बाहेर असलेल्या हॉटेल गुरुकृपा टी स्टॉल येथे आले तेव्हा आम्ही पंच नं 2 श्री. योगेष भाबड व सापळा पथक असे सदर हॉटेलच्या आजु बाजुस व परीसरात थांबुन राहिलो. थोडयावेळाने तक्रारदार राजेंद्र पाडवी यांनी उभे राहुन पुर्वनियोजित ठरवुन दिलेला इषारा केला. त्यानंतर आम्ही व सापळा पथकाने सोबत असलेल्या पंच क्र. 2 श्री. योगेष भाबड यांचेसह हॉटेल गुरुकृपा येथे जावुन लोकसेवक रविंद्र कानडे, कल्र्क, तहसील कार्यालय तळोदा यांना ताब्यात घेतले. तसेच आमचे सुचनेवरुन पोहवा/विजय ठाकरे यांनी तक्रारदार यांचे षर्टच्या आतिल बनियनला लावलेले व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. तेव्हा आमच्या सुचनेवरुन पंच नं. 02 श्री. योगेष भाबड यांना लोकसेवक रविंद्र कानडे, यांची अंगझडती घेण्यास सांगितले असता , रविंद्र कानडे, कल्र्क, तहसील कार्यालय तळोदा यांच्या पॅन्टच्या मागिल उजव्या बाजुच्या खिष्यात असलेली 5000/- रुपये लाचेची रक्कम मिळुन आल्याने त्यांनी ती ताब्यात घेतली. सदर वेळी पंच नं 1 श्री. सिध्देष जगताप यांना हकिकत विचारली असता त्यांनी सांगितले की, "तक्रारदार श्री. राजेंद्र पाडवी, यांनी तहसील कार्यालय तळोदा येथे लोकसेवक रविंद्र कानडे यांचेषी चर्चा केली असता, तक्रारदार राजेंद्र पाडवी यांनी लोकसेवक रविंद्र कानडे यांना चहा घेण्यासाठी जावु असे सांगितले व दोन्ही कार्यालयाच्या बाहेरील जय गुरुकृपा टी स्टॉल येथे गेले तेथे लोकसेवक रविंद्र कानडे यांना तक्रारदार हे खरेदी करीत करत असलेल्या षेत मालकाच्या नावाचे कुळ कायादयाचे कलम 32 (एम) प्रमाण पत्र देण्याच्या मोबदल्यात 5,000/-रुपये लाचेची रक्कम लोकसेवक रविंद्र कानडे, कल्र्क , तहसील कार्यालय तळोदा यांना लाचेची रक्कम देण्यासाठी पुढे केली असता लोकसेवक रविंद्र कानडे, कल्र्क , यांनी लाचेची रक्कम उजवे हाताने स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या मागिल उजव्या बाजुच्या खिष्यात ठेवली." बाबत पंच नं 1 श्री. जगताप यांनी हकिकत सांगितली. तसेच तक्रारदार यांनी सुध्दा याप्रमाणे मिळती जुळती हकिकत सांगितली. त्यानंतर लोकसेवक रविंद्र कानडे, कल्र्क,तहसील कार्यालय तळोदा यांना त्यांचे संपुर्ण नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. रविंद्र निंबा कानडे, वय 51 वर्षे, व्यवसाय नोकरी सहाय्यक महसुल अधिकारी, तहसील कार्यालय तळोदा, जिल्हा नंदुरबार रा. 4, सुंदरच कॉलोणी साक्री रोड धुळे ह.मु. गुरुकुल नगर तळोदा असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा दोन्ही पंचांसमक्ष सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आला आहे.

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस ठाणे अंमलदार
तळोदा पोलीस स्टेशन
जि.नंदुरबार

**Registered by** (नोंदणी अधिकारी)
**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rajendra Ganesh Mc
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):